# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे

फोन नं ०२२-२९४५१००१

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र. १४८** **दिनांक ०८/०६/२०२१**

## उत्तन पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात देशी दारूच्या अवैध साठयावर श्री.अमित काळे,पोलीस उप-आयुक्त ,परिमंडळ-०१ यांची कारवाई

दिनांक ०७/०६/२०२१ रोजी उत्तन पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात एका चाळीमध्ये मोठया प्रमाणात देशी दारूचा अवैध साठा करुन ठेवला असल्याचे श्री.अमित काळे,पोलीस उप-आयुक्त ,परिमंडळ-०१,मिरारोड,यांना मिळालेल्या बातमीनुसार त्यांचे मार्गदर्शनाखाली परिमंडळ ०१ पोलीस पथकाने चंद्रकांत पाटील यांची चाळ, खोली नं.०१ व ०२ मध्ये, भाटेबंदर, लाईट हाउसजवळ , उत्तन, ता.जि.ठाणे येथे छापा घातला असता तेथे दोन्ही खोल्यांमध्ये देशी दारु जीएम.संत्रा व दिलबहार शौंफ या ब्रॅन्डच्या प्रत्येकी ९० मिलीच्या ३७२५ बाटल्या एकुण १,११,७५०/- रूपये किंमतीचा मुद्देमाल मिळुन आला. या प्रकरणी चंद्रकांत पाटील, रा.ठी. भाटेबंदर,लाईट हाउसजवळ, उत्तन, ता.जि.ठाणे यांच्याविरुध्द उत्तन पोलीस ठाणे गु.रजि.क्र १००/२०२१ कलम ६५(ई) मुंबई दारु बंदी कायदयान्वये दि.०८/०६/२०२१ रोजी गुन्हा नोंद केला आहे.

सदरची कारवाई श्री.अमित काळे, पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-०१ यांचे अधिपत्याखाली स.पो.नि.दत्तुसाहेब लोंढे,पो.हवा.२२२४/अजय मांडोळे,पो.ना./अंकुश पाटील,विजेता नाईक यांनी केली आहे.

................oooooo...................